ePaper

## माजी खासदार गजानन कीर्तिकर यांच्या पत्नीचे निधन, 82 व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास


|| वर्ष - 8 | अंक -176 || UDYAM-MH-26-0158827 ||





# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 5 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


### आतील पानांत


- कोहलीचा बाद होताच संयम सुटला !
- पंतने अर्धशतकासह घडवला इतिहास
- भौतिकशास्त्रज्ञ चिदंबरम यांचे निधन
- मोदींनी अदाणींना मोठे केले!


## 25 दिवस होऊनही मारेकऱ्यांना अटक नाही

# सर्व आरोपी पुण्यातच कसे सापडत आहेत?

### संतोष देशमुख हत्येप्रकरणी सुप्रिया सुळेंचा सवाल

| पुणे | महाईन्यूज

**बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी हत्या करण्यात आली होती. त्यामुळे अजूनही राज्यभरात संताप व्यक्त होत आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येला २५ दिवस होऊनही पोलिसांना अद्याप सर्व मारेकऱ्यांना अटक करता आलेली नाही. या प्रकरणातील तिसरा आरोपी कृष्णा आंधळे अजूनही फरार आहे.**

दरम्यान आज सकाळी मुख्य आरोपी सुदर्शन घुलेसह सुधीर सांगळेला पुण्यातून अटक करण्यात आले आहे. सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे आणि सुधीर सांगळे हे संतोष देशमुख यांची हत्या झाल्यापासून फरार होते. त्यांना पकडण्यासाठी सीआयडीने प्रसिद्धीपत्रक जारी करत त्यांना फरार घोषित केले होते.

### संतोष देशमुख यांच्या हत्येची दिल्लीतही चर्चा

राष्ट्रवादीच्या (शरद पवार) बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज संतोष देशमुख हत्या प्रकरणावर माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्या म्हणाल्या, “उशीरा का होईना, पण या प्रकरणातील दोन मुख्य आरोपी सापडेल आहेत. पण, मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटत आहे की, या केसमध्ये ज्या अटक होत आहेत त्या पुण्यातूनच कशा होत आहेत. त्यामुळे पोलिसांनी यावर अधिकृत माहिती द्यावी. कारण, हे प्रकरण आता महाराष्ट्रापुरते राहिले नाही. याबाबत दिल्लीतही चर्चा सुरू असून, दिल्लीतील वर्तमानपत्रांमध्येही याबाबत बातम्या येत आहेत.”




### 2 आरोपींना पुण्यातून अटक

या प्रकरणातील सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे या आरोपींना आज पुण्यातून अटक करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. तसेच आरोपींना मदत करणाऱ्या डॉ. संभाजी वायभसेंनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. डॉ. वायभसे यांनी आरोपींना पळून जाण्यासाठी मदत केली होती, अशी माहिती समोर येत आहे.

### एक आरोपी फरार

संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणात एकूण सात आरोपी आहेत. यातील विष्णू चाटे, जयराम चाटे, प्रतीक घुले आणि महेश केदार या चार आरोपींना आधीच अटक करण्यात आली होती. तर आज सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे यांना अटक करण्यात आली आहे. आज अटक करण्यात आलेल्या आरोपींना न्यायालयाने १४ दिवसांची सीआयडी कोठडी सुनावली आहे. दरम्यान, आरोपींपैकी कृष्णा आंधळे अजूनही फरार आहे.

### पालकमंत्र्यांबाबत पहिल्यांदाच अशी चर्चा

पालकमंत्री पदाबाबत सुप्रिया सुळे म्हणाल्या की, निवडून आल्यानंतर सरकार बसलं आहे. ही सरकारची जबाबदारी आहे. पण पालक मंत्र्यांबाबत पहिल्यांदाच मी अशी चर्चा ऐकली आहे. अनेकवेळा सत्ता येते पण पालकमंत्री पदाबाबत अशी चर्चा ही राज्याच्या हिताची नाही. सरकारला एवढं मोठं बहुमत मिळालं आहे तरीही सगळ्याच गोष्टी उशिरा होत आहेत. अनेक मंत्र्यांनी चार्ज घेतलेला नाही.

> “ संवेदनशील मुख्यमंत्र्यांनी बीड प्रकरणांमध्ये निर्णय घ्यावा. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी पारदर्शकपणे परभणी आणि बीड प्रकरणात न्याय दिला पाहिजे. संवेदनशीलपणा दाखवल पाहिजे. राजकरण बाजूला ठेवून कारवाई झाली पाहिजे. खासदार
>
> -सुप्रिया सुळे, उमेदवार, महाविकास आघाडी.

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून अपेक्षा

लाडकी बहीण योजनेचे निकष बदलण्याबाबत सुळे म्हणाल्या, “मी अगोदर ही याबाबत बोलले होते कालही बोलले आहे हे अपेक्षित होतं. हे मी सातत्याने बोलत होते. आता सरकार आलं असून मला आरोप करायचे नाहीत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून अपेक्षा आहे. ते महत्त्वाच्या पदावर बसले आहेत. राज्याचा फिस्कल डिपॉझिट रिपोर्ट पाहा, कधी तरी पॉलिसीवर बोललं पाहिजे.

## विद्यमान आमदाराचा नातू पिंपरी-चिंचवडमधून बेपत्ता

### नोकरीसाठी मुलाखत द्यायला गेला होता, सांगवी पोलिस ठाण्यात तक्रार

| पिंपरी | प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुण्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. विद्यमान आमदाराचा भाचा बेपत्ता झाल्याची खळबळजनक घटना घडली आहे. पुण्यातील खासगी रूग्णलयात मुलाखतीसाठी चाललो असल्याचं सांगून गेलेला आमदाराचा भाचा माघारी परतला नाही. या विद्यमान आमदाराचे नाव रत्नाकर गुट्टे असून गंगाखेड विधानसभा मतदारसंघातून विजयी झाले आहेत.**



नोकरीसाठी मुलाखत द्यायला चाललो आहे, असे सांगून परळी तालुक्यातील दैठणा घाट या आपल्या मूळ गावावरून निघालेला आमदार रत्नाकर गुट्टे यांच्या सख्ख्या भाचीचा मुलगा पिंपरी-चिंचवड शहरातून बेपत्ता झाला आहे. ही घटना दोन जानेवारीला पिंपळे निलख येथील रक्षक चौकात घडली आहे. सुमीत भागवत गुट्टे (वय २४, रा. दैठाना घाट, ता. परळी, जि. बीड) असे बेपत्ता झालेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी सुमीत यांच्या आईने सांगवी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचा मुलगा सुमीत याचे नर्सिंगचे शिक्षण पूर्ण झाले आहे. तो नोकरीसाठी प्रयत्न करीत होता. पाच ते सहा दिवसांपूर्वी तो गावावरून पिंपरी-चिंचवड येथे आला. ज्युपिटर हॉस्पिटलला मुलाखतीसाठी चाललो आहे, असे सांगून तो गावावरून शहरात आला. दोन दिवस तो आळंदी येथे राहिला. त्यानंतर गुरुवारी सकाळी तो रक्षक चौक येथे आला. मात्र, तेथून तो बेपत्ता झाला. त्याचा फोनही त्यानंतर बंद येत आहे. शुक्रवारी

### ...म्हणून मूक मोर्चास गुट्टे नव्हते

परभणी जिल्ह्यातील गंगाखेड विधानसभेचे प्रतिनिधित्व करणारे आमदार रत्नाकर गुट्टे यांच्या भाचीला गुट्टे यांच्या गावातच दिले आहे. सुमीत हा त्यांच्या भाचीचा मुलगा आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ परभणीत सर्वपक्षीय मूक मोर्चा काढण्यात आला होता. मात्र, आमदार गुट्टे या मोर्चाला उपस्थित राहू शकले नाहीत. आपला नातू बेपत्ता झाला असल्याने मला या मोर्चात सहभागी होता आले नाही, असे त्यांनी स्थानिक पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# सुरक्षित रिक्षाप्रवासाची हमी देणार ?

## पुणे रेल्वे स्थानकातून बाहेर पडणारे प्रवासी कुणी न्यायचे

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे रेल्वे स्थानकातून बाहेर पडणारे प्रवासी कुणी न्यायचे, यावरून रिक्षाचालकांमध्ये होणारी वादावादी आणि अडवणूक यांमुळे प्रवाशांच्या त्रासात मात्र भर पडत आहे. याबाबत रेल्वे प्रशासन, शहर वाहतूक पोलीस आणि पुणे उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे (आरटीओ) तक्रारी करण्यात आल्या असून, ठोस कार्यवाहीची प्रवाशांची मागणी आहे.**



पुणे रेल्वे स्थानकातून प्रवासी बाहेर आल्यानंतर रिक्षाचालकांकडून प्रवाशांच्या भोवती घातला जाणारा गराडा, प्रवासी पुढे जात असला, तरी त्याचा अक्षरशः पाठलाग करून रिक्षात बसण्यासाठी लावला जाणारा तगादा, यामुळे प्रवासी हैराण होत आहेत. त्यातच प्रवासी प्रीपेड रिक्षा केंद्रावर गेलाच, तर तेथे इतर रिक्षाचालकांकडून प्रवाशाला अडवणूक होते, असे चित्र आहे. त्यामुळे नक्की कोणता पर्याय निवडायचा, अशा संभ्रमात प्रवासी पडत असल्याचे दिसून आले आहे.रेल्वे स्थानकात प्रीपेड रिक्षाचालक संघटना आणि मीटरवरील रिक्षाचालक यांच्यामध्ये मारहाणीच्या घटनाही वाढल्या आहेत. नजीकच्या बंडगार्डन पोलिस ठाण्यात याबाबत १३ ते १४ गुन्हे दाखल झाले आहेत. मध्यंतरी दोन परदेशी तरुणांना मीटरवरील रिक्षाचालकाने अतिरिक्त शुल्क आकारून दूर नेऊन लुटल्याचीही घटना घडली. मीटरवरील रिक्षाचालक प्रवाशांना इच्छितस्थळी सोडल्यानंतर मीटरवरील शुल्कापेक्षा जास्त शुल्काची मागणी करत असल्याच्या तक्रारीदेखील आरटीओ कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत 'पुणे रेल्वे स्थानकात वाहतूक पोलीस, रेल्वे प्रशासन आणि आरटीओ यांच्या समितीने ठरवून दिलेल्या दरपत्रकानुसार १७ रुपये प्रति किलोमीटर दराप्रमाणे प्रवाशांकडून प्रवासी शुल्क आकारण्यात येत आहे. त्यासाठी विशेष रंग आणि प्रवाशांच्या दृष्टीने सुरक्षितता पुरवण्यात आली आहे. प्रवाशांकडूनही प्रीपेड रिक्षाचा पर्याय निवडला जात आहे. या सुविधेला दिवसेंदिवस प्रवाशांकडून मागणी वाढत असल्याने मीटरवरील रिक्षाचालकांकडून अडचणी निर्माण केल्या जात आहेत,' असा आरोप भारतीय गिग कामगार मंचाचे केशव क्षीरसागर यांनी केला. 'रेल्वे स्थानकात सुरू करण्यात आलेल्या प्रीपेड केंद्र सुविधा प्रवाशांच्या आणि रिक्षाचालकांच्या दृष्टीने फायदेशीर आहे. मात्र, गिग कामगार संघटना मीटरवरील रिक्षाचालकांवर दादागिरी करते. त्यामुळे त्यांच्याकडून प्रीपेड रिक्षा केंद्राची जबाबदारी काढून घेण्यात यावी, असे निवेदन स्थानिक पोलीस प्रशासन, आरटीओ, वाहतूक पोलिसांकडे देण्यात आले आहे,' अशी माहिती राष्ट्रवादी रिक्षा संघटनेचे अध्यक्ष विजय रवळे यांनी दिली.आम्ही फक्त सुरक्षित आणि परवडणाऱ्या रिक्षा सेवेच्या शोधात असतो. तो पर्याय प्रीपेड रिक्षा केंद्रावरून मिळत असल्यास

### प्रवाशांच्या त्रासात भर

रेल्वे स्थानकाबाहेर नेहमीच रिक्षाचालकांचा गराडा आणि वादावादीच्या घटना घडत आहेत. त्यामुळे प्रवाशांना ताटकळत थांबावे लागते. प्रीपेड रिक्षाचालकांना होणाऱ्या त्रासाबाबत संबंधित संघटनेकडून निवेदन प्राप्त झाले आहे. लवकरच संबंधित रिक्षाचालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी बोलून कार्यवाही करण्यात येईल. प्रवाशांना त्रास देणाऱ्या रिक्षाचालकांवर तातडीने कारवाई करण्याबाबत शहर वाहतूक पोलिसांकडे पत्र पाठविण्यात आले आहे.पुणे रेल्वे स्थानकातून प्रवासी बाहेर आल्यानंतर रिक्षाचालकांकडून प्रवाशांच्या भोवती घातला जाणारा गराडा, प्रवासी पुढे जात असला, तरी त्याचा अक्षरशः पाठलाग करून रिक्षात बसण्यासाठी लावला जाणारा तगादा, यामुळे प्रवासी हैराण होत आहेत. त्यातच प्रवासी प्रीपेड रिक्षा केंद्रावर गेलाच, तर तेथे इतर रिक्षाचालकांकडून प्रवाशाला अडवणूक होते, असे चित्र आहे.

# पुण्यात मराठी कर्मचाऱ्यांचा पगार थकवला !

## कार्यालियात हिंदी बोलण्याची सक्ती; अन् मनसेचा खळखट्याक

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असला तरीही मराठी भाषिकद्वेषी अनेकजण महाराष्ट्रात आहेत. त्यांच्यामुळे राज्यात सातत्याने भाषिक वाद होत आहेत. गिरगाव, मुंब्र्यानंतर आता चक्क पुण्यात एका अमराठी मालकाने मराठी तरुणांवर अन्याय केला आहे. नेहमीप्रमाणे या वादातही मनसेने हस्तक्षेप केल्याने तरुणांना न्याय मिळाला.**



मनसेचे राज्य सचिव आशिष साबळे पाटील यांनी व्हिडिओमार्फत दिली आहे. पुण्यातील वाकडेवाडी येथे एअरटेलचं कार्यालय आहे. या कार्यालयातील टीमलीडर शाहबाज अहमदने काही मराठी मुलांवर अरेरावी केली. कार्यालयात हिंदीतच बोलण्याची सक्ती केली. तर गेल्या तीन महिन्यांचा पगारही रखडवून ठेवला होता. एवढंच नव्हे तर हिंदू सणांना सुट्टीही देणं बंद केलं होतं. यासंदर्भात पीडित तरुणांनी मनसेशी संपर्क साधला होता. त्यानुसार मनसेचे राज्यसचिव आशिष साबळे पाटील यांनी एअरटेल कार्यालयातील व्यवस्थापकांशी संवाद साधून याप्रकरणी लवकरात लवकर तोडगा काढण्याचे आवाहन केले होते. अन्यथा पुण्यातील तीन एअरटेलची कार्यालये फोडण्याचा इशारा दिला होता. परंतु, तरीही पीडित तरुणांच्या समस्या सोडवण्यास वरिष्ठ कमी पडले.अखेर वैतागलेल्या पीडित तरुणांनी पुन्हा मनसे कार्यालयात धाव घेऊन याप्रकरणी तत्काळ हस्तक्षेप करण्याची मागणी केली. टीम लीडरकडून मराठी बोलण्यास नकार दिला जातोय. कार्यालयात हिंदीत बोलण्याची सक्ती केली जाते, असं तरुणांनी सांगितलं. तसंच, कोणत्याही सेनेला घेऊन या, तुमचा पगार देणार नाही, तुम्हाला कामावरून काढून टाकणार अशा धमक्या देण्यात आल्या, अशी माहिती मनसेच्या पदाधिकाऱ्यांना देण्यात आली. मराठी भाषिक तरुणांवर अशाप्रकारे अन्याय होत असल्याने आशिष साबळे पाटील यांनी तत्काळ एअरटेल कार्यालयात जाऊन संबंधित टीम लीडरशी चर्चा केली. तरीही त्याची अरेरावी चालूच होती, असा दावा करण्यात येतो.शेवटी मनसे स्टाईलने या अमराठी टीम लीडरला दणका दिला असून सोमवारी या कर्मचाऱ्यांचा थकीत पगार देण्यात आला. अन्यथा एकाच दिवशी स्वारगेट, वाकडेवाडी आणि खराडी येथील तीन एअरटेल कार्यालये फोडण्याचा इशारा देण्यात आला होता.

### मराठी मुलांवर अरेरावी केली

मनसेचे राज्य सचिव आशिष साबळे पाटील यांनी व्हिडिओमार्फत दिली आहे.पुण्यातील वाकडेवाडी येथे एअरटेलचं कार्यालय आहे. या कार्यालयातील टीमलीडर शाहबाज अहमदने काही मराठी मुलांवर अरेरावी केली. कार्यालयात हिंदीतच बोलण्याची सक्ती केली. तर गेल्या तीन महिन्यांचा पगारही रखडवून ठेवला होता. एवढंच नव्हे तर हिंदू सणांना सुट्टीही देणं बंद केलं होतं. यासंदर्भात पीडित तरुणांनी मनसेशी संपर्क साधला होता. त्यानुसार मनसेचे राज्यसचिव आशिष साबळे पाटील यांनी एअरटेल कार्यालयातील व्यवस्थापकांशी संवाद साधून याप्रकरणी लवकरात लवकर तोडगा काढण्याचे आवाहन केले होते.

## रिक्षाचालकाच्या मृत्युस जबाबदार असलेल्यांना कडक शिक्षा व्हावी : बाबा कांबळे

# खाजगी सावकारांच्या जाचाला कंटाळून रिक्षाचालकाची आत्महत्या!

## महिलेसह चार जणांच्या विरोधात निगडी पोलिसांत गुन्हा दाखल

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सावकाराच्या त्रासाला कंटाळून साईबाबा नगर चिंचवड स्टेशन येथील रिक्षा चालक राजू राजभर यांनी आत्महत्या केल्याची घटना घडली. त्या बाबत संबंधीत सावकारावर कठोर कारवाई हवी, अशी मागणी महाराष्ट्र रिक्षा पंचायतचे अध्यक्ष बाबा कांबळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली. त्याबरोबरच शासकीय पातळीवरच रिक्षा चालकांना आधार मिळावा, यासाठी धोरण हवे, असे प्रतिपादनही बाबा कांबळे यांनी केले.**



पिंपरीत नुकतेच रिक्षा चालक राजू राजभर यांनी आत्महत्या केल्याची घटना माध्यमांद्वारे समोर आली आहे. त्या पार्श्वभूमीवर बाबा कांबळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे या घटनेचा निषेध व्यक्त केला. प्रसिद्धीपत्रकात कांबळे यांनी नमूद केले की, रिक्षा चालकांच्या अन्यायाला अनेक जण कारणीभूत आहेत. ओला उबेर सारख्या कंपन्या एकूण भाड्याच्या ४० टक्के कमिशन घेते. त्यामुळे दिवसभर रिक्षा चालवूनही रिक्षा चालकांच्या हाती तुटपुंजी रक्कम येते. त्यामुळे अशा भांडवलदार कंपन्यांवर कंपन्यांवर कारवाई करा. शासनाने मुक्त रिक्षा परवाना धोरण सुरू केले आहे. त्यामुळे शहरात पुर्वी पाच हजार रिक्षांची असणारी संख्या सध्या ४० हजारांवर पोचली आहे. त्यामुळे प्रवासी मिळत नाहीत आणि नफाही होत नाही. त्यामुळे मुक्त रिक्षा परवाना हे धोरण बंद करा, अशी मागणी बाबा कांबळे यांनी केली. इलेक्ट्रिक रिक्षाला देखील परमिटच्या कक्षेत आणा. इलेक्ट्रिक रिक्षांना परमिट नसल्यामुळे नव्याने इलेक्ट्रिक रिक्षांची देखील संख्या वाढत आहे. त्यांना आळा घालण्याची मागणी बाबा कांबळे यांनी केली.

यावर आळा न घातल्याने रिक्षा चालक-मालकांच्या हाती काहीच नफा उरत नाही. परिणामी कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी ते सावकाराचे अथवा खासगी बँकांकडून जादा व्याज दराने कर्ज घेतात. त्याची परतफेड करणे शक्य न झाल्याने रिक्षा चालकांवर आत्महत्या करण्याची वेळ येत आहे. हे होऊ नये, यासाठी शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे, अशी मागणी बाबा कांबळे यांनी केली.

## आत्महत्याग्रस्त रिक्षा चालकाच्या कुटुंबास वीस लाखाची आर्थिक मदत देण्याची मागणी

### रिक्षा चालकांचे कर्ज सरसकट माफ करा..

रिक्षा चालकांचे कर्ज माफ करा, अशी भूमिका बाबा कांबळे यांनी घेतली आहे. शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यानंतर सरकारने शेतकऱ्यांचे कर्ज सरसकट माफ केले. त्याच धर्तीवर कर्ज बाजारीपणाला कंटाळून रिक्षा चालक आत्महत्या करत आहेत. त्यांच्याही डोक्यावरचे सरसकट कर्ज माफ करा. रिक्षा चालकांच्या कुटुंबाला वीस लाख रुपये आर्थिक मदत द्या, असे आवाहन कांबळे यांनी शासनाला केले. रिक्षा चालकांच्या आत्महत्या होऊ नयेत, यासाठी शासनाने पाऊले उचलावीत. सरकारी बँकांमध्ये कमी व्याजदारात कर्ज उपलब्ध करून द्यावे. तसेच मुक्त रिक्षा परवाना बंद करावा. इलेक्ट्रिक रिक्षांना परमिट सक्तीचे करावे. ओला उबेर कंपन्यांवर कारवाईचा बडगा उगारावा. यासह रिक्षा चालकांच्या मृत्युला कारणीभूत असलेल्या सर्वांवर कडक कारवाई करावी.

**– बाबा कांबळे,** अध्यक्ष, महाराष्ट्र रिक्षा पंचायत.

---

# ‘फार्मर्स स्ट्रीट’ उपक्रमास उत्स्फुर्त प्रतिसाद!

## पिंपरी चिंचवडकरांनी घेतला नैसर्गिक, सेंद्रिय उत्पादनांचा आस्वाद

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**स्थानिक शेतकरी, नर्सरी यासोबतच फुड प्रोसेसिंग कंपन्यांना पाठिंबा देण्यासाठी, शाश्वत पद्धतींचा प्रसार करण्यासाठी आणि निसर्गसंपत्तीच्या समृद्धतेचा उत्सव साजरा करण्यासाठी महापालिकेच्या उद्यान विभागाच्या वतीने फार्मर्स स्ट्रीट या दोन दिवसीय उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा केवळ उपक्रम नसून ग्राहक आणि उत्पादक यांच्यातील नाते दृढ करण्याचा आणि शहरातील स्थानिक कृषी, व्यापारी समुदायाच्या उपजीविकेला पाठिंबा देण्याचा एक महत्वाकांक्षी प्रयत्न आहे, असे प्रतिपादन आयुक्त शेखर सिंह यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिका उद्यान विभाग व मेसर्स पुणे अर्बनली संस्थेच्या वतीने पिंपळे सौदागर येथील लिनिअर गार्डन येथे ‘फार्मर स्ट्रीट’ चे आयोजन ४ व ५ जानेवारी रोजी करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते आज झाले, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उद्यान व वृक्ष संवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, उद्यान अधिक्षक राजेश वसावे आदी उपस्थित होते.

लिनीअर गार्डन येथे भरविण्यात आलेल्या फार्मर्स स्ट्रीटवर शेतकऱ्यांकडून व रोपवाटिकांकडून थेट आणलेले नैसर्गिक आणि सेंद्रिय फळे, भाजीपाला, कृषी उत्पादने आणि हातकाम केलेल्या वस्तुंचे प्रदर्शन नागरिकांना पाहायला मिळणार आहे. याशिवाय, नैसर्गिक सौंदर्यप्रसाधने आणि प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांचे स्टॉल्स देखील येथे लावण्यात आले होते. दरम्यान, सकाळी पिंपळेसौदागर येथील मल्टीफिट आणि मार्वेल या व्यायामशाळेतील प्रशिक्षकांनी फार्मर्स स्ट्रीट येथे नागरिकांसाठी मोफत झुंबा सेशन्स घेतले ज्याला नागरिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दर्शविला. ४ जानेवारी रोजी म्हणजे शेवटच्या दिवशी सकाळी नागरिकांसाठी मोफत योगा, ड्रम सर्कल व लाईव्ह सिंगिंगच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून रात्री या उपक्रमाचा समारोप आमदार शंकर जगताप आणि आयुक्त शेखर सिंह यांच्या उपस्थितीत पार पडला.

### स्टॉलधारकांच्या प्रतिक्रिया..

“ पिंपरी चिंचवड महापालिकेच्या उद्यान विभागाने उत्पादक ते ग्राहक यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी राबविलेला हा उपक्रम कौतुकास्पद आहे. या उपक्रमामुळे आमच्यासारख्या स्थानिक व्यापाऱ्यांची उत्पादने थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्यास मदत मिळाली असून त्यांचाही या उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळत आहे. यापुढेही असे उपक्रम राबविले जावेत अशी आमची इच्छा आहे.

**– अमित सराफ,** स्टॉलधारक, अनुस किचन

“ नैसर्गिक आणि सेंद्रिय उत्पादनांबद्दल नागरिकांचा असलेला उत्साह पाहून आनंद वाटला. महापालिकेच्या वतीने राबविण्यात आलेल्या अशा उपक्रमांमुळे आम्हाला केवळ आर्थिक मदत होत नाही तर नैसर्गिक शेती आणि उत्पादन पद्धती अवलंबण्याची प्रेरणाही मिळते.

**– शोभा राजळे,** स्टॉलधारक, गुडवन सेंद्रिय गुळ

### नागरिकांच्या प्रतिक्रिया..

‘फार्मर स्ट्रीट’ हा उपक्रम आमच्यासाठी खूपच महत्त्वाचा आहे. या ठिकाणी आम्हाला ताज्या भाज्या, व फळे आणि सेंद्रिय उत्पादने थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करण्याची संधी मिळाली. आजकालच्या धकाधकीच्या जीवनात, अशा उपक्रमांमुळे शेतकऱ्यांशी जोडला जाणारा थेट संवाद खूपच प्रेरणादायी आणि समाधानकारक वाटला.

**–वैभव सिंग चौहान,** आयटी प्रोफेशनल, पिंपळे सौदागर



## भूमिका

# ‘एच- वन बी’बद्दल गोंधळलेलेच!

**‘एच- वन बी’ व्हिसा हे भारतीय तंत्रज्ञान-कर्मचाऱ्यांना अमेरिकेत जाण्याचे ‘वरदान’ मानले जाते. पण याच ‘एच- वन बी’मुळे अमेरिकन स्थानिकांवर अन्याय होतो आहे, अशी भाषा २०१६ साली डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी पहिल्यांदा येऊ पाहात होते, तेव्हा त्यांनी केली होती.**

मग २०१७ मध्ये ट्रम्प यांनी स्थानिकांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्याचा प्रशासकीय आदेश काढून ट्रम्प यांनी ‘एच- वन बी’ व्हिसांची संख्या खरोखरच कमी केली. अखेर ट्रम्प यांचा तो कार्यकाळ २०20 मध्ये संपला. मात्र ‘स्थानिकांना प्राधान्या’चा मुद्दा अमेरिकी राजकारणामध्ये चर्चेत उरला आणि हा मुद्दा किंवा ‘अमेरिकेला गतवैभव मिळवून देणे’ यासारखे मुद्दे लोकांना भिडल्यामुळेच तर ट्रम्प हे आता पुन्हा राष्ट्राध्यक्षपदी निवडून आले. पण इथून पुढे, ‘एच- वन बी’च्या वादातले तडे उघड होऊ लागले. तेही गेल्या फार तर महिन्याभरातल्या घडामोडींमधून. घडले ते असे की, तंत्र-आधारित उद्योगांत अफाट पैसा गुंतवणारे इलॉन मस्क आणि अमेरिकेत औषधकंपनी चालवताना राजकारणात आलेले (मूळ भारतीय वंशाचे पण आता १०० टक्के अमेरिकन) विवेक रामस्वामी यांनी ‘एच- वन बी’ला पाठिंबा देणारी विधाने करणे आरंभले. त्यात भर पडली ती श्रीराम कृष्णन हे आपले ‘कृत्रिम



बुद्धिमत्ताविषयक सल्लागार’ असतील, अशी भावी नेमणूक ट्रम्प यांनी जाहीर केल्यामुळे. कृष्णन यांची ‘एच- वन बी’बद्दलची मते लपून राहिलेली नाहीत. तंत्रकुशल अशा कर्मचाऱ्यांना- मग ते कुठल्याही देशातून आलेले असोत- त्यांना ‘एच- वन बी’च काय, लवकरात लवकर ‘ग्रीन कार्ड’सुद्धा देण्याचा विचार करावा, तसे करताना देशादेशांमध्ये भेद न करता उमेदवाराची हुषारी आणि गुणवत्ताच फक्त पाहावी, असे या कृष्णन यांचे म्हणणे.

त्यावर लॉरा लूमर नावाच्या खंद्या ट्रम्पसमर्थक आणि समाजमाध्यमातल्या ‘इन्फ्लुएन्सर’ इतक्या भडकल्या की दोनतीन दिवस अमेरिकी आणि जगभरच्या अन्य माध्यमांतून या लूमर यांच्या संतापाचीच बातमी सुरू होती... त्यातून, ‘एच- वन बी’ ला विरोध असण्यामागे दडलेली खरी कारणे वंशभेद- वर्णभेदापर्यंत जाणारी आहेत आणि त्याला ‘अमेरिकेला महान करू- स्थानिकांनाच प्राधान्य देऊ’ वगैरे लोकानुनयी घोषणांचा मुलामा दिला जातो आहे, हेही उघड होऊ लागले. ट्रम्प यांनी थोडी नरमाई दाखवून हा वाद बाजूला सारला आहे... पण हे असले राजकारण अमेरिकेत सुरू आहे, त्यामागची कारणे काय? हा विषय फक्त अमेरिकेच्याच राजकारणापुरता आहे का? नव्वदच्या दशकात ज्याचा डांगोरा पिटला गेला, त्या ‘जागितकीकरणा’चे नेमके काय झाले? तितके मागे जायचे नसेल तर ताजा प्रश्न – अमेरिकेतले ट्रम्प हे उजवे आणि भारतातही गेली दहा वर्षे सरकार आहे ते उजव्या पक्षांचेच. पण अमेरिकेतल्या उजव्यांना ‘एच- वन बी’ नको आहे, तर भारतातला सत्ताधारी पक्ष हा ‘आम्ही (अमेरिकेडून, भारतीयांसाठी) जास्तीतजास्त ‘एच- वन बी’ व्हिसा मंजूर करवून घेऊ’ अशी चर्चा आपल्या समर्थकांमध्ये पेरतो आहे. खुद्द अमेरिकेतसुद्धा इलॉन मस्क, विवेक रामस्वामी, श्रीराम कृष्णन (इतकेच काय पण बिल गेट्स, मार्क झकरबर्ग आदींनाही) ‘एच- वन बी’ हे वरदान वाटते पण लॉरा लूमरसारख्या अनेकांना तो शाप वाटतो, असे कसे? भांडवलशाही आणि राष्ट्रवाद यांच्यातला हा झगडा आहे, हेच याचे उत्तर! हे उत्तर अनेक राज्यशास्त्रज्ञ, सामाजवैज्ञानिक यांच्या अभ्यासांशी ताडून पाहाता येण्याजोगे आहेच. पण अमुक विद्वान काय म्हणतो, तमुक काय नमूद करतो, याची उजळणी न करता साधी जमिनीवरली परिस्थिती पाहिली तरीसुद्धा ‘भांडवलशाहीच्या गरजा विरुद्ध भावनांवर आधारलेला लोकानुनयी राष्ट्रवाद’ यांमधला हा झगडा उघडच दिसून येतो. अमेरिकेतल्या बहुराष्ट्रीय कंपन्या ‘एच- वन बी’वर बाहेरच्या लोकांना कर्मचारी म्हणून इथे आणतात आणि अमेरिकी भूमिपुत्रांवर अन्याय होतो, असे अमेरिकी देशभक्त उजव्यांचे म्हणणे आहे. हे उजवे गृहीत धरतात की, आपल्या नोकऱ्या ‘बाहेरच्यां’मुळे धोक्यात आल्या आहेत, त्यातही हे ‘बाहेरचे’ लोक गोरे- युरोपीय नाहीत, ते ख्रिस्ती नाहीत, हीदेखील अमेरिकेतील अनेक उजव्या सामान्यजनांची खदखद आहेच.

## प्रासंगिक »

# गरजा मर्यादित

***पर्यायी ऊर्जास्रोत कितीही शोधले, तरीही भविष्यातील अनेक पिढ्यांना मोकळा श्वास घेता यावा, पुरेसे अन्न-पाणी उपलब्ध व्हा***

आजमितीला अवघे जग हवामान अरिष्टाच्या गर्तेत असून केव्हा, कुठे आणि कशा स्वरूपाच्या आपत्तीस सामोरे जावे लागेल याचा नेम नाही! दररोज कुठे न कुठे भुस्खलन, भूकंप, चक्रीवादळे, हिमनद्या वितळणे, उष्णतेच्या लाटा, वणवे, अवर्षण व साथींना सामोरे जावे लागते. होय, पूर्वी यापैकी काही उत्पात होत होते. मात्र, अलीकडे त्यांची व्याप्ती, वारंवारिता व उग्रता कैकपटींनी वाढली आहे. क्षणार्धात होत्याचे नव्हते होते. मुख्य म्हणजे हे उत्पात निसर्गाचा कोप नसून मानवाने निसर्गात केलेल्या अविवेकी व अवाजवी हस्तक्षेपाचा परिणाम आहे.

जेव्हा आपण मानवनिर्मित आपत्ती म्हणतो तेव्हा सर्व लोक नव्हे तर सत्ताधीश, धनदांडगे धोरणकर्ते यास जबाबदार आहेत, हे नि:संदिग्धपणे अधोरेखित केले पाहिजे. ऋतूचक्रात बिघाड, निसर्गाचे असंतुलन, निसर्गचक्रात बाधा येणे यामुळे हवामान बदलाची समस्या ओढवली आहे. यास मुख्यत: कारणीभूत आहे.

**देशात सगळे काही नीट सुरू आहे, विकासाची फळे सगळ्यांपर्यंत पोहोचली आहेत आणि त्यामुळे इथे प्रत्येकजण आनंदी आहे, असा सरकारचा दावा आहे. तसे असेलही, नव्हे आहेच, पण आनंदी असणारे लोक आणि नसणारे लोक यांचे प्रमाण व्यस्त आहे, बेरोजगारीने, महागाईने त्रस्त लोकांपर्यंत सरकार पोहोचत नाही, त्याचे काय?**

# ‘सावित्रीच्या लेकीं’ची वाट खडतरच...

आज ३ जानेवारी, लोकांनी फेकलेले दगडधोंडे, शेण स्वत: झेलत स्त्रियांना शिक्षणाची, आत्मसन्मानाची वाट खुली करून देणाऱ्या सावित्रीबाई फुले यांची १९४ वी जयंती. आपल्या या रुढीग्रस्त, पुरुषप्रधान समाजात स्त्रियांच्या शिक्षणाचा आग्रह धरणाऱ्या सावित्रीबाईंच्या जवळपास २०० वर्षांपूर्वीच्या या धाडसाची आजही कशाशीच तुलना होऊ शकत नाही. त्यानंतरही स्त्रीशिक्षणाचा आग्रह धरणाऱ्या, त्यासाठी खस्ता खाणाऱ्यांनी ही वाट प्रशस्त केली. आज हव्या त्या विषयाचं शिक्षण घेणाऱ्या, वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये नवनवी क्षितिजं गाठणाऱ्या स्त्रियांनी सावित्रीबाईच्या कायमच ऋणात असायला हवं. पण असं असलं तरी स्त्रीशिक्षण, सक्षमीकरण हे सरसकट सगळीकडे झालेलं नाही. सावित्रीबाईंनी प्रशस्त केलेली स्त्रीशिक्षणाची वाट आजही कुठे कुठे झाकोळलेली दिसते. अजूनही काही राज्यांमध्ये स्त्रियांना मुलभूत शिक्षणही मिळत नाही, तर काही राज्यांमध्ये लग्नाचे



वय होईपर्यंतच शिकवलं जातं. शिक्षण हे सक्षमीकरणाच्या वाटेवरचं महत्त्वाचं साधन असल्यामुळे ते नसेल तर बाकी सगळ्या वाटा बंद होतात. एक पुरु, शिकला तर एक व्यक्ती सुशिक्षित होते, पण एक स्त्री शिकली तर एक कुटुंब सुशिक्षित होतं, असं गांधीजी म्हणाले होते ते याच अर्थाने. सावित्रीबाईंच्या जयंतीच्या आदल्याच दिवशी वर्तामानपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेल्या एका आकडेवारीमध्ये (UDISE म्हणजेच UNIFIED DISTRICT INFORMATION SYSTEM FOR EDUCATION) २०१९ आणि २०२४ या पाच वर्षांदरम्यान शिक्षणाचं काय झालं याची माहिती देण्यात आली आहे. स्त्रियांच्या शिक्षणाचं वास्तव ती आपल्यासमोर मांडते. पण ते फक्त स्त्रीशिक्षणाचं वास्तव न राहता आपल्या समाजाचा आरसा त्यामधून दिसतो.केरळ या राज्यामध्ये २०१९ पासून २०२४ पर्यंत, प्राथमिक शिक्षणात मुलींचं प्रमाण अव्वल आहे. म्हणजे २०१९ मध्ये १०० मुलींनी प्राथमिक शिक्षणासाठी प्रवेश घेतला असेल तर २०२४ मध्येही १०० मुलींनी प्राथमिक शिक्षणासाठी प्रवेश घेतला आहे. माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीत हे प्रमाण ९३.२ वरून ९७.५ वर आलं आहे. म्हणजे वाढलं आहे. इतर कोणत्याही राज्यात एवढी अधिक आकडेवारी बघायला मिळत नाही. केरळपाठोपाठ हिमाचल प्रदेशमध्ये मुलींच्या शिक्षणाची आकडेवारी उत्तम आहे. तिथं २०१९ मध्ये ९९.२ मुलींनी प्राथमिक शिक्षणासाठी प्रवेश घेतला होता तर २०२४ मध्ये हे प्रमाण ९९.६ आहे. २०१९ मध्ये तिथं ९२.५ मुलींनी माध्यमिक शाळेत प्रवेश घेतला तर २०२४ मध्ये ९५.६ मुलींनी माध्यमिक शिक्षणासाठी प्रवेश घेतला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

\- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# संतोष देशमुखांच्या हत्येच्या निषेध!

## 9 जानेवारीला ग्रामपंचायतीमध्ये काम बंद आंदोलन

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या अमानवीय हत्येनंतर महाराष्ट्रातील समाजमन हेलावले आहे. या महाभयानक हत्येमुळे राज्यातील सरपंच, उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य भयभीत झालेले आहेत. अनेक गावात ग्रामपंचायत कारभार करताना गावकारभारी दबावाखाली असतात. सरपंच व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी शासनाने कायदा करून ठोस उपाययोजना कराव्यात, या मागणीसाठी, तसेच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ राज्यातील ग्रामपंचायतीत ९ जानेवारीला काम बंद आंदोलन करण्यात येणार असल्याचे पंचायत राज मंच संचालित अखिल भारतीय सरपंच परिषदेने जाहीर केले आहे.**




अखिल भारतीय सरपंच परिषदेच्या वतीने स्व. संतोष देशमुख यांना राज्यातील प्रत्येक गावात ग्रामपंचायतीमध्ये श्रद्धांजली वाहण्यात येऊन येत्या गुरुवारी (९ जानेवारी) एक दिवस काम बंद आंदोलन करण्याचे परिषदेचे संस्थापक व प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील व राज्य सरचिटणीस विवेक ठाकरे, वरिष्ठ उपाध्यक्ष शशिकांत मोरे यांनी जाहीर केले आहे. यासंदर्भातील निर्णय शासनाला कळवण्यात आला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना ईमेलद्वारे याबाबत मागणी निवेदन दिले आहे.

राज्यातील सर्वच ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या भावना अत्यंत तीव्र आहेत. लोकप्रतिनिधी म्हणून आणि ग्रामीण महाराष्ट्रातील गावखेड्यातील सामाजिक वातावरण चांगले राहण्यासाठी सरपंच व सर्वच गावकारभारी असणाऱ्या सहकाऱ्यांना संरक्षण असणे अत्यंत गरजेचे आहे. सरपंच हा पब्लिक सर्व्हन्ट असल्याबाबत तेलंगणा व राजस्थान उच्च न्यायालयासह सर्वोच्च न्यायालयाचाही निर्णय आहे. त्यानुसार सरपंचाच्या फिर्यादीवरून शासकीय कामात अडथळा आणला म्हणून पूर्वीचे भादवी ३५३, आताचे भारत न्यायसंहिता १३२ प्रमाणे गुन्हा नोंद व्हावा, तरच गावच्या विकासकामात अडथळा आणणाऱ्यावर जरब बसेल. गावच्या हितासाठी समाजसेवेमध्ये भाग घेणाऱ्या सरपंचांना व त्यांना मदत करणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना कायदेशीर संरक्षण अत्यावश्यक असल्याचे या निवेदनात म्हटले आहे.



### सरपंच परिषदेच्या शासनाकडे मागण्या

- सरपंच व ग्रामपंचायत कर्मचारी संरक्षण कायदा असावा
- प्रत्येक ग्रामसभेला पोलीस संरक्षण अनिवार्य करण्यात यावे
- स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशीच व्हावी
- स्वर्गीय संतोष देशमुख कुटुंबियातील एकाला शासकीय नोकरी द्यावी
- स्व. संतोष देशमुख यांचे स्मारक त्यांच्या गावात उभे करावे
- सरपंचांना विमा संरक्षण व पेन्शन लागू व्हावे
- ग्रामसभा सर्व ग्रामस्थांसाठी असल्याने ग्रामपंचायतीच्या मासिक मीटिंगमध्ये इतरांना कायद्याने प्रतिबंध असावा

# जीवघेण्या नायलॉन मांजाची विक्री थांबेना

## मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमिवर छत्रपती संभाजीनगरातीलबांबू व्यावसायिकाचा नामी तोडगा

। छत्रपती संभाजीनगर।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**नायलॉन मांजामुळं अनेक ठिकाणी अपघात होत असल्याच्या घटना वारंवार समोर येत आहेत. त्यामुळं यावर उपाय म्हणून छत्रपती संभाजीनगरातील एका बांबू व्यावसायिकानं भन्नाट जुगाड केलाय.**



एका बांबूच्या छोट्या काडीच्या मदतीनं दुचाकीच्या हॅंडलवर एक कमान तयार करून देत व्यावसायिकानं मांजामुळं चालकाच्या जीविताला होणारा धोका टाळण्याचा प्रयत्न केलाय. विशेष म्हणजे नायलॉन मांजाची विक्री होत असलेल्या ठिकाणी अगदी मोफत सेवा देण्याचे काम करत आहे. शीतल कपूर असं या व्यावसायिकाचं नाव आहे. गेल्या आठवड्यात त्यांनी पाचशेहून अधिक नागरिकांना मोफत सेवा दिलीय. पतंग उडवण्याचा काळ संपेपर्यंत ही सेवा देत राहणार असल्याचं त्यांनी सांगितलंय.

### अशी सुचली कल्पना :

शहरातील सर्वात जुना परिसर म्हणजे राजाबजार आहे. या भागात पतंग विक्रीची अनेक दुकानं आहेत. त्यामुळं इथं नायलॉन मांजाची विक्रीही केली जाते. संक्रातीच्या काळात मोठ्या प्रमाणात पतंग उडवले जातात. मात्र, या दरम्यान नायलॉन मांजा सर्रास वापरल्या जात असल्यानं दुचाकीस्वारांच्या जीवाला धोका निर्माण होतो. तसंच या मांजामुळं अनेक ठिकाणी अपघाताच्या घटनादेखील घडतात. त्यामुळं यावर उपाय म्हणून आपल्याकडं असलेल्या बांबूच्या काड्यांचा वापर होऊ शकतो, अशी कल्पना बांबू व्यावसायिक शीतल कपूर यांना सुचली. त्यानुसार त्यांनी यावर काम सुरू केले.

### स्वत:पासूनच सुरुवात

शीतल कपूर यांनी बांबूच्या काडीचा वापर करत सर्वप्रथम स्वतःच्या दुचाकीसाठी एक कमान तयार केली. दुचाकीला असलेल्या दोन आरश्यांच्या सहाय्यानं ही कमान बांधण्यात आली. या कमानीमुळं समोर मांजा आल्यास तो आपोआप दुचाकीस्वारांना इजा न करता बाजूला सारला जाईल. या कमानीचा प्रयत्न यशस्वी झाल्यानंतर त्यांनी हा प्रयोग इतरांना सांगितला. सुरुवातीला ओळखीच्या लोकांच्या दुचाकीसाठी त्यांनी कमान तयार करून दिली. त्यानंतर त्यांनी प्रत्येक नागरिकांना मोफत सेवा देण्यास सुरुवात केली. रोज किमान 20 ते 30 दुचाकीस्वारांना ही मोफत सेवा देत आहेत. मागील काही दिवसात पाचशेहून अधिक लोकांना मोफत कमान बसवून दिल्याची माहिती शीतल कपूर यांनी दिली.

### दुचाकीस्वारांनी केला आनंद व्यक्त

राजाबाजार येथे राहणारे ठोले यांचे या कमानीमुळं थोडक्यात प्राण बचावले. त्यांनी सांगितलं की, ते दुचाकीवरुन जात असताना अचानक त्यांच्यासमोर मांजा आला. मात्र, त्यांनी त्यांच्या दुचाकीला कमान लावल्यामुळं मांजा डोळ्याच्या बाजूनं निघून गेला. अन्यथा मांजामुळं गळा चिरला असता. तर शीतल कपूर यांच्या या सेवेमुळं नक्कीच एखाद्याचा जीव वाचू शकतो. मांजापासून वाचण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. पण, मांजाची विक्री होऊ नये, याकरिता पोलीस आणि जिल्हाप्रशासनानं मांजा तयार करणाऱ्यांवर आणि विक्री करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिक करत आहेत.

# मोदींनी अदाणींना मोठे केले!

## अमेरिकेतील खटल्यांवरून माजी केंद्रीय मंत्र्याची टीका

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**न्यूयॉर्कच्या न्यायालयाने २६५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सच्या लाचखोरीच्या आरोपाखाली उद्योगपती गौतम अदानी आणि इतरांविरुद्ध सुरू असलेल्या तीन खटल्यांना एकत्र करण्याचे आदेश दिले आहेत. आता या सर्व खटल्यांची सुनावणी एकत्रितपणे केली जाईल, असा निकाल न्यायालयाने दिला. या तिन्ही खटल्यांमध्ये एकाच प्रकारचे आरोप असल्याने हा निर्णय दिल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.**




ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी एका इंग्रजी वृत्त संकेतस्थळाची बातमी एक्सवर पोस्ट करत, ऊर्जा क्षेत्रातील कंत्राटे मिळवण्यासाठी अदाणींनी २६५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स इतकी लाच दिल्याचा आरोप असल्याचे म्हटले होते. आता प्रशांत भूषण यांच्या एक्सवरील याच पोस्टवर प्रतिक्रिया देत माजी केंद्रीय मंत्री सुब्रमण्यम स्वामी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. यामध्ये स्वामी यांनी म्हटले आहे की, “मोदींनी प्रत्येक नियम मोडत अदाणींना मोठे केले आहे.”प्रशांत भूषण यांच्या पोस्टवर प्रतिक्रिया देताना सुब्रमण्यम स्वामी म्हणाले की, “मोदींनी, अदाणींना ‘बागेच्या वाटेवर’ (चुकीच्या मार्गावर) नेल्यानंतर आता स्वत:ची कातडी वाचवण्यासाठी त्यांना दूर केले आहे. अदाणी हे उपद्रवी आहेत, पण मोदींनीच प्रत्येक नियम मोडून त्यांना इतके मोठे केले. इतकेच नव्हे, तर मोदी त्यांच्यासाठी एक दिवस ग्रीसलाही गेले होते.”उद्योगपती गौतम अदाणी आणि त्यांच्या सात अधिकाऱ्यांविरुद्ध लाचखोरी प्रकरणी अमेरिकेतील न्याय विभागाने गेल्या महिन्यात गुन्हे दाखल केले आहेत. भारतीय अधिकाऱ्यांना जवळपास हजारो कोटी रुपयांची लाच देण्याची योजना आखून, त्या बदल्यात ऊर्जा क्षेत्रातील कंत्राटे मिळवणे, त्यासाठी अमेरिकी कंपन्यांकडून वित्तपुरवठा मिळवणे आणि याविषयी (अमेरिकेतील) गुंतवणूकदारांना अंधारात ठेवणे असे प्रमुख आरोप आहेत. अमेरिकेच्या सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्डानेही अदानी समूहाच्या तेथील कंपन्यांच्या समभागांच्या उलाढालीसंदर्भात चौकशी सुरू केली आहे.भारतीय जनता पार्टीकडून खासदार आणि केंद्रीय मंत्री राहिलेले सुब्रमण्यम स्वामी हे कायमच त्यांच्या भूमिकांसाठी आणि वादग्रस्त विधानांसाठी चर्चेत असतात. याचबरोबर गेल्या काही काळात स्वामी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सातत्याने लक्ष्य केले आहे. इतकेच नव्हे तर गेल्या वर्षी पंढरपूरमध्ये आल्यानंतर त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींची तुलना रावणाशी केली होती. मोदींचा एकेरी उल्लेख करत मोदी फार अहंकारी असल्याचे ते म्हणाले होते.यानंतर ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी एका इंग्रजी वृत्त संकेतस्थळाची बातमी एक्सवर पोस्ट करत, ऊर्जा क्षेत्रातील कंत्राटे मिळवण्यासाठी अदाणींनी २६५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स इतकी लाच दिल्याचा आरोप असल्याचे म्हटले होते. आता प्रशांत भूषण यांच्या एक्सवरील याच पोस्टवर प्रतिक्रिया देत माजी केंद्रीय मंत्री सुब्रमण्यम स्वामी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.सुब्रमण्यम स्वामी म्हणाले की, “मोदींनी, अदाणींना ‘बागेच्या वाटेवर’ नेल्यानंतर आता स्वत:ची कातडी वाचवण्यासाठी त्यांना दूर केले आहे.

### अमेरिकेने गुन्हे दाखल केले आहेत

अदाणी हे उपद्रवी आहेत, पण मोदींनीच प्रत्येक नियम मोडून त्यांना इतके मोठे केले. इतकेच नव्हे, तर मोदी त्यांच्यासाठी एक दिवस ग्रीसलाही गेले होते.”उद्योगपती गौतम अदाणी आणि त्यांच्या सात अधिकाऱ्यांविरुद्ध लाचखोरी प्रकरणी अमेरिकेतील न्याय विभागाने गेल्या महिन्यात गुन्हे दाखल केले आहेत. भारतीय अधिकाऱ्यांना जवळपास हजारो कोटी रुपयांची लाच देण्याची योजना आखून, त्या बदल्यात ऊर्जा क्षेत्रातील कंत्राटे मिळवणे, त्यासाठी अमेरिकी कंपन्यांकडून वित्तपुरवठा मिळवणे आणि याविषयी (अमेरिकेतील) गुंतवणूकदारांना अंधारात ठेवणे असे प्रमुख आरोप आहेत. अमेरिकेच्या सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्डानेही अदानी समूहाच्या तेथील कंपन्यांच्या समभागांच्या उलाढालीसंदर्भात चौकशी सुरू केली आहे.भारतीय जनता पार्टीकडून खासदार आणि केंद्रीय मंत्री राहिलेले सुब्रमण्यम स्वामी हे कायमच त्यांच्या भूमिकांसाठी आणि वादग्रस्त विधानांसाठी चर्चेत असतात. याचबरोबर गेल्या काही काळात स्वामी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सातत्याने लक्ष्य केले आहे.

---

# भौतिकशास्त्रज्ञ आर. चिदंबरम यांचे निधन

## भारताच्या पहिल्या अणुचाचणीमध्ये बजावली होती महत्त्वाची भूमिका

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताच्या अण्वस्त्र कार्यक्रमात निर्णायक भूमिका बजावणारे भौतिकशास्त्रज्ञ डॉ. राजगोपाल चिदंबरम यांचे शनिवारी वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले. अणुऊर्जा विभागाने (DAE) दिलेल्या माहितीनुसार मुंबईतील जसलोक रुग्णालयात त्यांचे निधन झाले.**



“हे जाहीर करताना आम्हाला दु:ख होत आहे की, प्रख्यात भौतिकशास्त्रज्ञ आणि भारतातील सर्वात प्रतिष्ठित शास्त्रज्ञांपैकी एक असलेले डॉ. राजगोपाल चिदंबरम यांचे आज (४ जानेवारी २०२५) पहाटे ३.२० वाजता निधन झाले. डॉ. चिदंबरम यांचे भारताच्या वैज्ञानिक क्षेत्रातील योगदान अतुलनीय आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील त्यांचे दूरदर्शी नेतृत्व कायम स्मरणात राहील,” असे डीएईने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉ. राजगोपाल चिदंबरम यांच्या निधनानंतर, त्यांना आदरांजली वाहताना म्हटले की,” डॉ. राजगोपाल चिदंबरम यांच्या निधनाने खूप दुःख झाले. ते भारताच्या आण्विक कार्यक्रमाचे प्रमुख शिल्पकार होते आणि त्यांनी १९३६ मध्ये जन्मलेले डॉ. चिदंबरम चेन्नईतील प्रेसिडेन्सी कॉलेज आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बेंगळुरूचे माजी विद्यार्थी होते. डॉ. चिदंबरम यांना त्यांच्या अतुलनीय कार्याबद्दल १९७५ मध्ये पद्मश्री आणि १९९९ मध्ये पद्मविभूषण, तसेच अनेक विद्यापीठांकडून मानद डॉक्टरेटसह अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या कारकिर्दीत भारत सरकारचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार (२००१-२०१८), भाभा अणु संशोधन केंद्राचे संचालक अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष अशा अनेक प्रतिष्ठित पदांवर काम केले आहे.

### अनेक प्रतिष्ठित पदांवर काम

इतकेच नव्हे तर त्यांनी त्यांनी आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सीच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्ष (१९९४-१९९५) म्हणूनही काम केले आहे.आणि त्यांनी १९३६ मध्ये जन्मलेले डॉ. चिदंबरम चेन्नईतील प्रेसिडेन्सी कॉलेज आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बेंगळुरूचे माजी विद्यार्थी होते. डॉ. चिदंबरम यांना त्यांच्या अतुलनीय कार्याबद्दल १९७५ मध्ये पद्मश्री आणि १९९९ मध्ये पद्मविभूषण, तसेच अनेक विद्यापीठांकडून मानद डॉक्टरेटसह अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

# बॉलीवूड गाजवणाऱ्या माधुरीला एकेकाळी म्हटले जायचे पणवती

अभिनेत्री माधुरी दीक्षित(MADHURI DIXIT) धकधक गर्ल म्हणून ओळखली जाते. अभिनेत्रीने एकापेक्षा एक गाजलेल्या चित्रपटात काम करत स्वत:च्या अभिनयाची छाप सोडली आहे. आता सुपरस्टार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या अभिनेत्रीला तिच्या सुरूवातीच्या काळात मात्र मोठा संघर्ष करावा लागला. माधुरी दीक्षितचे सुरूवातीचे काही चित्रपट एका पाठोपाठ फ्लॉप ठरले. त्यानंतर १९८८ साली प्रदर्शित झालेला तेजाब या चित्रपटातून अभिनेत्रीला मोठी प्रसिद्धी मिळाली. त्यानंतर १९९० साली प्रदर्शित झालेला दिल, १९९२ साली प्रदर्शित झालेला बेटा, हम आपके है कोन, दिल तो पागल है अशा चित्रपटातून माधुरी दीक्षितला मोठी प्रसिद्धी मिळाली. मात्र ८० दशकाच्या अखेरच्या टप्प्यात माधुरी दीक्षितला पणवती असे म्हटले जायचे, अशी आठवण प्रसिद्ध दिग्दर्शक इंद्र कुमार यांनी सांगितली आहे. दिल व बेटा या चित्रपटाचे दिग्दर्शक इंद्र कुमार यांनी नुकतीच सिद्धार्थ कननला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी म्हटले, "आमिर खानचा एकच चित्रपट लोकप्रिय ठरला होता. 'कयामत से कयामत तक' हा त्याचा चित्रपट गाजला होता. माधुरी दीक्षितबरोबर त्याने एकाही चित्रपटात काम केले नव्हते. माधुरी दीक्षितला पणवती मानले जायचे. जेव्हा मी माधुरी दीक्षितला आमिर खानबरोबर दिल चित्रपटात कास्ट केले तोपर्यंत ठीक होते. मात्र जेव्हा मी तिला बेटा या चित्रपटासुद्धा कास्ट केले, त्यावेळी लोकांनी मला वेडे ठरवले. अनेकांनी मला म्हटले होते की, तू वेडा झाला आहेस, तिचा कोणताही चित्रपट चालत नाहीये", अशा प्रकारे अभिनेत्रीला कोणीही चित्रपटात घ्यायला तयार नव्हते, अशी आठवण इंद्र कुमार यांनी सांगितली आहे.याबद्दल अधिक बोलताना त्यांनी म्हटले, "त्यावेळी एक अशी मुलाखत आली होती.



# गोविंदा व त्याची पत्नी राहतात वेगळे

अभिनेता गोविंदाची पत्नी सुनीता आहुजाने त्यांच्या लग्नाबद्दल आणि पतीच्या रोमँटिक स्वभावाविषयी काही वक्तव्ये केली आहेत. सुनीताने सांगितलं की जेव्हा ती गोविंदाला भेटली होती, तेव्हा ती टॉमबॉयसारखी राहायची. तिचे केस लहान होते आणि ती स्कर्ट घालायची. "मी नेहमी शॉर्ट्स घालायचे. जेव्हा मी त्याला भेटले तेव्हा माझे केसदेखील लहान होते. तो म्हणायचा की मी मुलासारखी आहे. मी नेहमी साडी नेसावी अशी त्याची इच्छा होती, पण त्याबाबतीत तो मला कधीच आवडला नाही; कारण तो मागासलेल्या विचारांचा होता," असं सुनीता हिंदी रशला दिलेल्या मुलाखतीत म्हणाली. सुनीताने सांगितलं की गोविंदा मुलींना स्पर्श करण्यासही घाबरायचा, त्यामुळे नात्यासाठी तिनेच पुढाकार घेतला होता. गोविंदा खऱ्या आयुष्यात अजिबात रोमँटिक नाही, असं सुनीताने नमूद केलं. "आता तो रोमँटिक झाला आहे की नाही हे मला माहीत नाही. लोक तुमच्या पाठीमागे काय करतात हे तुम्हाला कधीच कळत नाही. पुरुषांवर कधीही विश्वास ठेवू नका. ते सारखे बदलत असतात. आमच्या लग्नाला ३७ वर्षे झाली आहेत. तो कुठे जाणार? पूर्वी तरी कुणाबरोबर गेला नाही, आताचं मी सांगू शकत नाही," असं मजेशीरपणे सुनीता म्हणाली.सुनीता व गोविंदा एकत्र राहत नाही. बहुतांशी दोघेही वेगवेगळ्या घरात राहतात. गोविंदा अनेकदा त्याच्या बंगल्यावर राहतो कारण त्याला मीटिंग आणि लोकांच्या भेटीगाठींमुळे उशीर होतो.

# नेहा पेंडसेच्या घरात 6 लाखांची चोरी

छोट्या पडद्यावरील 'भाबीजी घर पर हैं' ही मालिका चाहत्यांच्या घराघरात पोहोचली आहे. या मालिकेत 'अनीता भाभी'ची मुख्य भूमिका मराठी अभिनेत्री नेहा पेंडसेने साकारली आहे. दरम्यान अनिता भाभीची भूमिका साकारणाऱ्या नेहा पेंडसेच्या घरातून ६ लाखांचा रुपयांची चोरी झाली आहे. नेहाच्या घरातील एका नोकराने ६ लाखांचे दागिने चोरून पळ काढलाय. यानंतर नोकराच्या विरोधात नेहाच्या पतीने शार्दुल पोलिसांत गुन्हा दाखल केल्यानंतर त्याला अटक करण्यात आली आहे. या नोकराचे नाव सुमित कुमार सोलंकी असे आहे. एका रिपोर्टच्या माहितीनुसार, 'भाबीजी घर पर हैं' मालिकेतील 'अनीता भाभी' म्हणजे, नेहा पेंडसे तिच्या पती शार्दुलसोबत अरिटो बिल्डिंग, वांद्रे पश्चिम, मुंबईत राहते. दरम्यान शार्दुलला घरातील ६ लाखांचे दागिने लंपास झाल्याची माहिती पोलिसांना दिली आणि घरातील नोकराच्या विरोधात गुन्हा दाखल केला. या तक्रारीत शार्दुलने चोरीला गेलेल्या वस्तुत सोन्याचे ब्रेसलेट आणि हिऱ्याची अंगठी असल्याचे सांगितले आहे. दरम्यान पोलिसांनी घरातील सर्व नोकरांना बोलावून त्याची चौकशी केली. मात्र, या चौकशीदरम्यान नेहा पेंडसे घरात राहत असेलला नोकर सुमित कुमार सोलंकी बेपत्ता असून तो कुलाब्यात असल्याचे समजते. यानंतर पोलिसांनी त्याला फोनवरून या चोरीबद्दल विचारणा केली असताना त्यांने उत्तरे देण्यास टाळाटाळ केली. या प्रकारावरून पोलिसांनी त्याच्यावर संशय घेत सुमितला अटक केली. मात्र, चोरीचे दागिने अद्याप सापडलेले नाहीत. दरम्यान त्याच्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ड्राइव्हरने दिलेल्या माहितीनुसार, नोकर सुमित सोलंकीची दागिन्यांवर नजर पडली आणि त्याने त्याच्यावर डल्ला मारला. नेहाच्या घरी सुमित इतर लोकांसोबत राहत होता. सोन्याचे ब्रेसलेट आणि हिऱ्याची अंगठी या दोन्ही गोष्टी नेहाने शार्दुलला गिफ्ट केल्या होत्या.



# सुरभी ज्योती लवकरच म्हणणार 'कुबूल है'?

सध्या मनोरंजन विश्वातही लगीन घाई सुरु आहे. नुकतीच आमिर खानची मुलगी आयरा खानने नुपूर शिखरेसोबत लग्न केलं तर अभिनेत्री रकुल प्रीतने देखील तिचा बॉयफ्रेंड जॅकी भगनानीसोबत लग्न करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आता आणखी एका अभिनेत्री नववधू होण्यासाठी तयार असल्याच्या चर्चा आहेत. ती अभिनेत्री म्हणजे कबूल है फेम अभिनेत्री सुरभी ज्योती. सर्वांची लाडकी झोया म्हणजेच सुरभी ज्योती तिचा बॉयफ्रेंड सुमित सुरीसोबत लग्न करणार आहे. सुरभी नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. ती तिच्या कामाव्यतिरिक्त लव्ह लाईफमुळे देखील चर्चेत राहिली आहे. सुमित सुरीपूर्वी सुरभीचे नाव अभिनेता पर्ल व्ही पुरीशी जोडले गेले होते. आता सुरभीच्या लग्नाची सोशल मिडियावर चर्चा होत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, सुरभी ज्योती सुमित सुरीसोबत लग्नबंधनात अडकणार आहे. सुमित हा बिझनेसमॅन असण्याबरोबरच अभिनेता आणि निर्माता आहे. सुरभी बऱ्याच वर्षांपासून सुमितला डेट करत आहे. सुरभी आणि सुमित हे 6 किंवा 7 मार्चला लग्न करणार असल्याचा दावा सुरभीच्या जवळच्या मैत्रिणीने केला आहे. तिच्या लग्नात फक्त कुटुंब आणि मित्र उपस्थित राहणार आहेत. सुमित सूरीने द टेस्ट केस आणि होम सारख्या ओटीटी शोमध्ये काम केले आहे. त्याने सुरभीसोबत एका म्युझिक व्हिडिओमध्ये काम केले आहे. 2018 मध्ये त्याच्या नात्याच्या चर्चा सुरु झाल्या होत्या.

# कोहलीचा बाद होताच संयम सुटला !

## झेलबाद झाल्याचे पाहताच स्वत:वरच संतापला

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताचा रनमशीन विराट कोहलीसाठी बॉर्डर गावस्कर ट्रॉफी २०२४-२५ फारच खराब राहिली आहे. या मालिकेतील अखेरच्या सामन्यातही विराट कोहली मोठी खेळी खेळू शकला नाही आणि दोन्ही डावात तो स्वस्तात बाद झाला. पण विराट कोहली संपूर्ण मालिकेत एकाच पद्धतीने बाद होताना दिसला आणि अखेरच्या डावातही तसंच काहीसं झालं. सिडनी कसोटीच्या दुसऱ्या डावात स्वस्तात बाद झाल्यानंतर विराट कोहली चांगलाच संतापलेला दिसला आणि त्याने त्याचा राग स्वतःवर काढला.**



सिडनी कसोटीच्या दुसऱ्या डावात विराट कोहलीला १२ चेंडूत केवळ ६ धावा करता आल्या. या डावात तो स्कॉट बोलँडचा बळी ठरला. सामन्याच्या पहिल्या डावातही त्याला बोलँडनेच बाद केले होते. विराटला पुन्हा एकदा बाहेर जाणाऱ्या चेंडूवर नियंत्रण ठेवता आले नाही आणि तो स्लिपमध्ये स्टीव्ह स्मिथकडून झेलबाद झाला. विराट कोहलीने या सामन्यात फलंदाजीला उतरल्यावर सकारात्मक सुरूवात केली होती. विराटने बाहेर जाणारे चेंडू चांगल्याप्रकारे बचाव केला होता, पण बाहेरचे चेंडू खेळण्याचा मोह त्याला फार वेळ आवरला नाही.पाचव्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावातही असंच काहीसं पाहायला मिळालं होतं. मात्र यावेळी तो विकेट गमावल्यानंतर चांगलाच संतापलेला दिसला. बाद झाल्यानंतर तो स्वतःलाच दोष देताना दिसला आणि त्याने हाताने स्वत:लाच मारलं. कोहलीने बाद झाल्यानंतर आपल्याच पायावर पंच केला, राग आणि निराशा व्यक्त करत विराट कोहली पुन्हा एकदा संघ अडचणीत असताना स्वस्तात बाद झाला. स्कॉट बोलँड विराट कोहलीसाठी कर्दनकाळ ठरला आहे. बोलँडने विराटला सारख्याच पद्धतीने या मालिकेत ८ वेळा बाद केलं आहे.बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीची सुरुवात विराट कोहलीसाठी चांगली झाली. पर्थ कसोटीतील दुसऱ्या डावात त्याने शतक झळकावलं. मात्र यानंतर तो सलग ४ सामन्यांमध्ये फ्लॉप ठरला. पर्थ कसोटी वगळता एकाही कसोटीत त्याला अर्धशतकही झळकावता आले नाही. या मालिकेत खेळलेल्या ९ डावांपैकी ५ डावांमध्ये त्याला दुहेरी आकडाही गाठता आला नाही. या खराब कामगिरीमुळे त्याला ५ सामन्यांच्या मालिकेत २३.७५ च्या सरासरीने केवळ १९० धावा करता आल्या.भारताने पाचव्या कसोटीच्या दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत दुसऱ्या डावात ६ बाद १४१ धावा केल्या आहेत. भारताने ऑस्ट्रेलियाला पहिल्या डावात १८१ धावांवर सर्वबाद करत ४ धावांची आघाडी मिळवली होती. जैस्वाल-राहुलच्या जोडीने चांगली सुरूवात करून दिली. पण हे दोघेही फार काळ मैदानावर टिकू शकले नाहीत. यानंतर ऋषभ पंतने ६१ धावांची वादळी खेळी करत भारताची धावसंख्या १०० पुढे नेली. यासह भारताकडे दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत १४५ धावांची आघाडी आहे. तिसऱ्या दिवशी जडेजा आणि वॉशिंग्टन भारताच्या डावाची सुरूवात करतील.सिडनी कसोटीच्या दुसऱ्या डावात विराट कोहलीला १२ चेंडूत केवळ ६ धावा करता आल्या. या डावात तो स्कॉट बोलँडचा बळी ठरला. सामन्याच्या पहिल्या डावातही त्याला बोलँडनेच बाद केले होते. विराटला पुन्हा एकदा बाहेर जाणाऱ्या चेंडूवर नियंत्रण ठेवता आले नाही आणि तो स्लिपमध्ये स्टीव्ह स्मिथकडून झेलबाद झाला. विराट कोहलीने या सामन्यात फलंदाजीला उतरल्यावर सकारात्मक सुरुवात केली होती.

### अर्धशतकही झळकावता आले नाही

विराटने बाहेर जाणारे चेंडू चांगल्याप्रकारे बचाव केला होता, पण बाहेरचे चेंडू खेळण्याचा मोह त्याला फार वेळ आवरला नाही.पाचव्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावातही असंच काहीसं पाहायला मिळालं होतं. मात्र यावेळी तो विकेट गमावल्यानंतर चांगलाच संतापलेला दिसला. बाद झाल्यानंतर तो स्वतःलाच दोष देताना दिसला आणि त्याने हाताने स्वत:लाच मारलं. कोहलीने बाद झाल्यानंतर आपल्याच पायावर पंच केला, राग आणि निराशा व्यक्त करत विराट कोहली पुन्हा एकदा संघ अडचणीत असताना स्वस्तात बाद झाला. स्कॉट बोलँड विराट कोहलीसाठी कर्दनकाळ ठरला आहे. बोलँडने विराटला सारख्याच पद्धतीने या मालिकेत ८ वेळा बाद केलं आहे. बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीची सुरुवात विराट कोहलीसाठी चांगली झाली. पर्थ कसोटीतील दुसऱ्या डावात त्याने शतक झळकावलं. मात्र यानंतर तो सलग ४ सामन्यांमध्ये फ्लॉप ठरला. पर्थ कसोटी वगळता एकाही कसोटीत त्याला अर्धशतकही झळकावता आले नाही.

# पंतने वादळी अर्धशतकासह घडवला इतिहास

## ऑस्ट्रेलियात उत्कृष्ट कामगिरी करणारा जगातील पहिला फलंदाज

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत-ऑस्ट्रेलिया सिडनी कसोटीत ऋषभ पंतचा जलवा पाहायला मिळाला. ऋषभ पंतने पहिल्याच चेंडूपासून आक्रमक खेळी करत ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांची शाळा घेतली. दुसऱ्या दिवशी दुसऱ्या डावात ऋषभ पंतची तुफानी फलंदाजी पुन्हा एकदा पाहायला मिळाली. पहिल्या चेंडूवर येताच पंतने स्कॉट बोलँडला षटकार ठोकला.**



यानंतरही पंत इथेच थांबला नाही, त्याने प्रत्येक ऑस्ट्रेलियन गोलंदाजाला चोप दिला. दुसऱ्या डावात पंतने अवघ्या २९ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. या अर्धशतकासह त्याने नवा विक्रम रचला आहे.सिडनी कसोटीच्या दुसऱ्या डावात ऋषभ पंतने वादळी फलंदाजी करत अवघ्या २९ चेंडूत अर्धशतक झळकावले. आता पंत ऑस्ट्रेलियात सर्वात जलद कसोटी अर्धशतक करणारा प्रतिस्पर्धी संघाचा पहिलाच फलंदाज ठरला आहे. यापूर्वी हा विक्रम इंग्लंडच्या जॉन ब्राउन आणि वेस्ट इंडिजच्या रॉय फ्रेडरिक्स यांच्या नावावर होता, ज्यांनी ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर कसोटी क्रिकेटमध्ये ३३ चेंडूत अर्धशतक ठोकले होते. पण आता ऋषभ पंतने आता यांना मागे टाकलं आहे.ऋषभ पंत फलंदाजीसाठी क्रीझवर आला तेव्हा टीम इंडियाने ७८ धावांवर ४ विकेट गमावल्या होत्या. यानंतर ऋषभ पंतने दमदार फटकेबाजी करत ऑस्ट्रेलियाच्या प्रत्येक गोलंदाजाची धुलाई केली. या सामन्यात ऋषभ पंतने ३३ चेंडूत ६ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने ६१ धावांची खेळी केली आहे. कसोटी क्रिकेटच्या इतिहासात भारताकडून हे दुसरे सर्वात जलद अर्धशतक आहे.

### सर्वात वेगवान अर्धशतक

जे भारताच्या फलंदाजाने झळकावलेले सर्वात जलद अर्धशतक आहे. ऋषभ पंतचं कसोटी क्रिकेटमधील हे दुसरे सर्वात जलद अर्धशतक आहे. याआधी २०२२ मध्ये पंतने श्रीलंकेविरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये केवळ २८ चेंडूत अर्धशतक झळकावले होते. याशिवाय यशस्वी जैस्वाल आणि शार्दुल ठाकूर यांनी कसोटी क्रिकेटमध्ये ३१ चेंडूत अर्धशतकं झळकावली आहेत. १९८२ मध्ये टीम इंडियाचे माजी दिग्गज कर्णधार कपिल देव यांनी भारतासाठी पहिल्यांदाच सर्वात वेगवान अर्धशतक झळकावण्याचा पराक्रम केला होता.